# जाहिरात

## अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ नागपुर यांचे अंतर्गत कार्यालयाकरिता सेवानिवृत्त शाखा अभियंता/उप-अभियंता यांच्या सेवा "गुण नियंत्रण अभियंता" या पदाकरिता करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी घेण्याबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेबंर २०१६.

२) महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदानि-२०१८/प्र.क्र.११३/आ.पु.क. दि. ११ डिसेबंर २०१८

३) मुख्य अभियंता, जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण पुणे यांचे पत्र क्रमांक मुअ (स्था) /जविप्रवगुनि/आ-५/५१२/सन२०२२ दिनांक २१-०४-२०२२

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग अंतर्गत अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ नागपुर अंतर्गतच्या विदर्भातील नागपुर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपुर , अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा, अकोला आदी जिल्हातील **गुण नियंत्रणाशी संबंधित** विवक्षित कामे पुर्ण करणेकरिता "गुण नियंत्रण अभियंता" हे पद सेवानिवृत्त शाखा अभियंता/उप-अभियंता यांचेकडुन करार पध्दतीने ११ महिण्याच्या कालावधीकरिता भरणेकरिता अर्ज मागविण्यात येत आहे.इच्छुक व पात्र सेवानिवृत्त अभियंता यांनी विहीत नमुण्यात अर्ज खालील नमुद ठिकाणी व्यक्तीश: किंवा टपालाने दिनांक २५-०५-२०२२ रोजी सांयकाळी ५ वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावे. या मुदतीनंतर कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

करार पध्दतीने भरावयाच्या "गुण नियंत्रण अभियंता" या पदाचा विभाग व उपविभाग निहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | विभागीय कार्यालयाचे नांव | उपविभागाचे नांव | मुख्यालय | कार्यक्षेत्र जिल्हा | करार पध्दतीने भरावयाची पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, गुण नियंत्रण विभाग नागपुर | गुण नियंत्रण उपविभाग नागपुर | नागपुर | नागपुर | १ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | कार्यकारी अभियंता, गुण नियंत्रण विभाग वाही | गुण नियंत्रण उपविभाग वाही | वाही | भंडारा | २ |
| | | गुण नियंत्रण उपविभाग भिवापुर | भिवापुर | नागपुर | १ |
| | | गुण नियंत्रण उपविभाग गडचिरोली | गडचिरोली | गडचिरोली | १ |
| ३ | कार्यकारी अभियंता, गुण नियंत्रण विभाग अमरावती | गुण नियंत्रण उपविभाग अमरावती | अमरावती | अमरावती | २ |
| | | गुण नियंत्रण उपविभाग यवतमाळ | यवतमाळ | यवतमाळ | १ |
| ४ | कार्यकारी अभियंता, गुण नियंत्रण विभाग अकोला | गुण नियंत्रण उप विभाग अकोला | अकोला | अकोला | १ |
| | | गुण नियंत्रण उपिवभाग शेगांव | शेंगांव | बुलडाणा व अकोला | १ |
| ५ | गुण नियंत्रण विभाग खामगांव | गुण नियंत्रण उपविभाग खामगांव | खामगांव | बुलडाणा | १ |
| | एकुण | | | | ११ |

अ) <u>पदासाठी शैक्षणिक अर्हता व अनुभव:</u>

१) शासन मान्यता प्राप्त स्थापत्य अभियांत्रिकी पदवी/पदविका धारण करणारा सेवानिवृत्त शाखा अभियंता/उपअभियंता.

२) सेवानिवृत्त अभियंत्यांनी बांधकाम किंवा गुण नियंत्रण या कार्यप्रकारांत कमीत कमी १० वर्षाची सेवा केलेली असावी व त्याच्या पृष्ठर्थ आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) उमेदवार हा शारिरीक , मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याचेकडे आवश्यक क्षमता असावी.

४) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अभियंता यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण चालु अथवा प्रलंबित नसावे. याबाबत अर्जदारांनी साध्या कागदावर प्रतिज्ञा पत्र द्यावे. व नियुक्ती झाल्यानंतर ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झालेले आहेत. त्या संबंधित कार्यासनाकडुन तसे प्रमाणपत्र घेवुन सादर करणे बंधनकारक राहील.

ब) वयोमर्यादा

१) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अभियंता यांचे कमाल वयोमर्यादा हि ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

क) करार पध्दतीने करावयाच्या नियुक्तीबाबत अन्य अटी व शर्ती

१) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येणाऱ्या अभियंत्यास शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेबंर-२०१६ नुसार मासिक परिश्रामिक अदा करण्याच्या कमाल मर्यादेच्या अटीसह उर्वरित सर्व अटी व शर्ती लागु राहतील.

२) सदर नियुक्ती नियुक्तीच्या दिनांकापासुन ११ महिण्याच्या कालावधी असणार आहे. तसेच सदर अभियंत्यांची संभाव्य सेवा हि ०१-०६-२०२२ ते ३०-०७-२०२२ (२ महिणे) व ०१-११-२०२२ ते ३०-०७-२०२२ ( ९ महिणे ) अशी राहील. या संभाव्य सेवा कमी अधिक बदल करण्याच्या अधिकार अधीक्षक अभियंना राहतील. तसेच सदर नेमणुक एक वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता वाढविण्याचे आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी सक्षम स्तरावरील मान्यतेने तसा निर्णय घेवु शकतात.

३) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे, संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/समावुन घेण्याबाबत व नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल, याबाबत अर्जदाराने साध्या कागदावर प्रतिज्ञा लेख देणे बंधनकारक राहील.

४) काम समाधानकारक नसल्यास किंवा इतर कोणतेही कारणावास्तव नियुक्ती रद्य करण्याचे/सेवा समाप्त करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ नागपुर यांना राहतील.

५) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अभियंता यांनी त्यांची शारिरीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्य चिकीत्सक/स्थानिक डॉक्टरचे मुळ प्रमाणपत्र नियुक्ती देणेपुर्वी सादर करणे बंधनकारक राहील.

६) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमुन दिलेली विवक्षित कामे पुर्ण करण्याची जबाबदारी राहील.

७) सदर अभियंता त्यांच्यावर सोपविलेल्या/पार पाडण्यास दिलेल्या कामांत व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामांत गुंतलेला नसावा. अशा अधिकाऱ्यांना Conflict of Interest जाहीर करणे आवश्यक राहील.

८) अशा करार पध्दतीवर नियुक्त होणाऱ्या अभियंता यांनी त्यांना प्राप्त होणारे कागदपत्रे/माहिती कामाबाबत व आधार साम्रगी बाबत गोपनियता पाळणे बंधनकारक राहील.

९) नियुक्त अभियंता यांना त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराचे नेमुन दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१०) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अभियंता यांनी शेवटच्या तीन वर्षाचे गोपनिय अहवालाची प्रतवारी संबंधित कार्यालयाकडुन प्रमाणित करुन सादर करावी. तसेच प्रशिस्तपत्र/नैपुण्यपुर्वक कामे केली असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.

११) क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अभियंत्यास सेवा काळामध्ये काहीही नैसर्गिक अपघात व काही आजार उदभवल्यास कोणत्याही परिस्थितीत कार्यालय/शासन जबाबदार राहणार नाही.

१२) अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अभियंता यांनी कुंटुंब निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्ताऐवज सादर करावे.

१३) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अभियंत्याची नियुक्तीच्या ठिकाणी, नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आंत रुजु होणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१४) मुलाखातीकरीता पात्र अभियंत्यांना पत्र इमेल द्वारे पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीवर लघु संदेशाद्वारे कळविण्यात येईल. याकरिता अर्जदाराने आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांच्या ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखातीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियता, गुण नियंत्रण मंडळ नागपुर यांच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल व अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक/ईमेलद्वारे/पोष्टाद्वारे कळविण्यात येईल.

१५) सदर नियुक्ती हि निर्देशित विवक्षित कामांसाठी करण्यात येत असुन, त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही किंवा सर्व पदे रिक्त ठेवण्याच्या अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याकडे राखीव आहे.

१६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अभियंत्यास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तिय अधिकार राहणार नाही.

१७) उमेदवाराने सदर नेमणुकीकरिता कोणत्याही राजकीय व इतर मार्गाने दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा अर्ज तात्काळ रद्य करण्यात येईल.

१८) या जाहिरातीनुसार नियुक्त्या या निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल. पुरेशा निधी उपलब्ध नसल्यास कोणत्याही वेळी केलेल्या नियुक्ती रदद करण्याच्या अधिकार अधीक्षक अभियंता यांना राहील.

१९) उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन नियुक्त अधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतीम राहतील.

२०) एका उमेदवरास पसंतीच्या एकाच/दोन जिल्हाकरिता अर्ज सादर करता येईल

२१) नियुक्त होणाऱ्या अभियंत्यास नियुक्तीपुर्वी या जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य आहे याबाबतचे बंधपत्र रु. १००/- च्या स्टॅाम्प पेपरवर लिहुन सादर करणे बंधनकारक राहील.

ड) आवश्यक सुचना

१) सदर पदाकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना जाहिरातीसोबत जोडण्यात आलेला आहे. सदर विहीत नमुण्यातील अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरांत किंवा टंकलिखित करुन फोटोसह सादर करावयाचा आहे. विहीत नमुण्यात नसलेला व अपुर्ण अर्ज फेटाळण्यात येईल.

२) अर्जासोबत २२ से.मी. x १२ से.मी. आकाराचा स्वत:च्या नाव व पत्त्यासह पोस्टाचे रुपये १० + २ चे तिकीट लावलेला लिफाफा जोडावा.

३) अर्जाच्या पॉकीटावर " गुण नियंत्रण अभियंता या पदाकरिता करार पध्दतीने नेमणुक करणेबाबत" असे स्पष्ट लिहीण्यात यावे.

४) उमेदवाराने आपले अर्ज समक्ष किंवा पोष्टाद्वारे खालील दिलेल्या पत्यावर दिनांक २५/०५/२०२२ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने सादर करावे. त्यानंतर पोष्टाद्वारे अथवा अन्य मार्गे प्राप्त झालेल्या अर्जाची दखल घेतल्या जाणार नाही व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

| |
|---|
| अर्ज पाठविण्याच पत्ता: अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ नागपुर,<br>वैनगंगानगर अजनी नागपुर-४४०००३ |

Sanjay

(संजय विश्वकर्मा)
अधीक्षक अभियंता
गुण नियंत्रण मंडळ
नागपुर

# अर्जाचा नमुना

**अधीक्षक अभियंता, गुण नियंत्रण मंडळ नागपुर यांचे अंतर्गत कार्यालयाकरिता सेवानिवृत्त शाखा अभियंता/उपअभियंता यांच्या सेवा "गुण नियंत्रण अभियंता" या पदाकरिता करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी घेण्याबाबत करावयाच्या अर्जाचा नमुना**

| छायाचित्र येथे लावावे |
|---|

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवराचे संपुर्ण नांव | |
| २ | जन्म तारिख (दाखला जोडणे आवश्यक) | |
| ३ | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ४ | शैक्षणिक अर्हता (दाखला जोडणे आवश्यक) | |
| ५ | कामाचा अनुभव<br>अ) बांधकाम<br>आ) गुण नियंत्रण | |
| ६ | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | |
| ७ | पत्रव्यवहाराचा पत्ता<br>(इमेल व भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करावा) | |
| ८ | कुठल्याही प्रकारची विभागीय चौकशी चालु अथवा प्रस्तावित | आहे /नाही |
| ९ | जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे पसंतीचा कार्यक्षेत्राचा जिल्हा /जिल्हे | |
| १० | निवृत्तीपुर्वीचे वेतन व भत्याबाबतचा दाखला तसेच आज रोजी मिळत असलेल निवृत्ती वेतन व महागाई भता ( महालेखाकार कार्यालयाने मंजुर केलेली निवृत्ती वेतनाची आदेश सोबत जोडावी.) | |

ठिकाण:-

दिनांक:-

अर्जदारांची स्वाक्षरी